"B"

# "उत्तर भारतीय मैदान"

M. A. Take 9604575303

उत्तर भारतीय मैदान प्रदेश हा दुसरा स. मोठा भौगोलिक विभाग आहे.

विस्तार :- i) उत्तरेकडे हिमालय आणि दक्षिणेकडे द्विपकल्पीय पठार या दरम्यान

ii) पश्चिमेस राजस्थान ते पूर्वेकडे आसामच्या खोऱ्यापर्यंत ~~प्रदेशा~~।

पूर्व-पश्चिम लांबी :- 2400 km (सिंधु नदीचे मैदान धरून 3200 km

रुंदी - 150 ते 500 km सरासरी उंची 150 m.

पंजाबमध्ये 500 km तर आसाम 60-100 km

Imp- जगातील स. मोठे गाळाचे मैदान

(सिंधु नदीच्या मुखापासून ते गंगा नदीच्या मुखाप

* उत्तर भारतीय मैदानाचे भूरूपीय लक्षणे


i) भाबर - दगड-गोटे वाळू

ii) तराई - बारीक मातीचे संचयन (आर्द्रता जास्त त्यामुळे जिवारंगा प्रदेश)

iii) भांगर (बांगर) जुन्या-जलोढापासून मैदान

iv) खादर - नवीन मैदान (स. जास्त सुपीक)

v) त्रिभुज मैदान - खादरचे विस्तारित रूप




(उंचवट्यांच्या भूमीस "चारस" म्हणतात
दलदलीच्या क्षेत्रास "बिल्ल" म्हणतात


* या मैदानाचे 3 भागात विभाजन होते:

i) राजस्थान मैदान / थरचे वाळवंट

ii) पश्चिमी मैदानी प्रदेश (पंजाब-हरयाणा मैदान)

iii) गंगा मैदान (उर्ध्व, मध्य, निम्न)

iv) ⇒ पूर्व मैदान (बंगाल/आसाम/ब्रह्मपुत्रा मैदान)
⇒ त्रिभुज प्रदेश




1) राजस्थान मैदान / थरचे वाळवंट :-

याला भारतीय महावाळवंट किंवा थरचे वाळवंट असे जगातील 7 वे सं. मोठे वाळवंट. (2 लाख चौ km) म्हणतात.

विस्तार :- 650km लांब

उतार :- पश्चिम आणि दक्षिणेकडे

Note- लूनी ही नदी अरवली पर्वतातील पुष्कर दरीतून उगम पावते. लूनी ही राजस्थानच्या वाळवंटातील एकमेव नदी आहे.

* या प्रदेशाचे 2 उपविभाग पडतात

1) मरुस्थळ :- राजस्थानचे वाळवंट मरुस्थळ या नावाने ओळखले जाते. ते कच्छच्या रणापासून ते पंजाबपर्यंत पसरले आहे.

Imp:- बारखान — म्हणजे चंद्रकोरीच्या आकाराच्या वाळूच्या टेकड्या.

वैशिष्ट्ये
i) स्थान बदलणाऱ्या वालुकागिरी
ii) विषम हवामान स्थिती
iii) विरळ झाडी
iv) कमी लोकवस्ती

Note. वालुकागिरीचा आकार, विस्तार आणि वाऱ्याची दिशा यानुसार त्यांची वर्गवारी सैफ किंवा बारखान प्रकारात केली जाते.

ii) राजस्थान बागर :-

i) थरच्या वाळवंटाच्या पूर्वेला असलेल्या शुष्क मैदानी प्रदेशाला राजस्थान बागर असे म्हटले जाते. ⇒ ii) घग्गर व लुनी नद्यांच्या मैदानी प्रदेशाला बागर म्हणतात.

विस्तार - ईशान्य-नैऋत्य

Note ~~क्षितिज आंतरप्रमाणे विस्ताराचा~~

या भागाच्या उत्तरेकडील प्रदेश शेखावत प्रदेश म्हणून ओळखला जातो. याठिकाणी अनेक मिठाचे सरोवरे आहेत.

i) सांभर (स. मोठे आहे) ii) कुचामन iii) डिडवाना

लांबी 30 km

तापमान हिवाळ्यात 0° से तर उन्हाळ्यात 50° से

स्थानिक नावे. i) बावडी - परंपरागत पायऱ्यांची विहिर

ii) ताल - खाऱ्या सरोवर


iii) रोही - सुपीक प्रदेश

## iii) पंजाब - हरयाणा मैदान :-

विस्तार :- पश्चिमेस पंजाबपासून पूर्वेस यमुना नदीपर्यंत

लांबी :- 640 km पूर्व-पश्चिम रुंदी 300 km

पाच नद्यांचा प्रदेश (झेलम, चिनाब, रावी, बियास, सतलज)




याठिकाणी हंगामी छोटे नदी प्रवाह आहेत त्यांना स्थानिक भाषेत "चोस" म्हणतात

- दोन नद्यांच्या दरम्यानच्या भूमीला ~~दुआब~~ दोआब असे म्हटले जाते.

पंजाब मैदानात पुढील दोआब आहेत

i) सिंधसागर दोआब ( झेलम - चिनाब - सिंधु नदीच्या मध्यात)
2) चाज दोआब — चिनाब - झेलम
3) रेचना — रावी - चिनाब
4) बारी — बियास - रावी
5) बिस्त — बियास - सतलज
6)

~~बद~~

iii) गंगा मैदान :-

विस्तार - उत्तरेस हिमालयपर्वत आणि दक्षिणेस द्विपकल्पीय पठार यांदरम्यान

पूर्व - पश्चिम - "1400 km" उत्तर - दक्षिण 300 km

क्षेत्रफळ - 3.75 (लाख) चौ km (भारताच्या 9% भाग व्यापला)

देशाची 23% लोकसंख्या या ~~भागात~~ भागात राहते.

उतार - वायव्येकडून - आग्नेयस

सर्वसाधारण उतार दर कि.मी.स 15 से.मी.

सर्वाधिक उंची ~~सर्वाधिक उंची~~ सहारणपूरच्या उत्तरेस 276 मी

स. कमी कोलकाता येथे 6 मी.

3 विभाग पडतात

i) ऊर्ध्व गंगा मैदान :-

विस्तार — पश्चिम - पूर्व ~~पूर्व - पश्चिम~~ लांबी 550 km

उंची - पश्चिमेस 300 m तर पूर्वेस 100 मी

प्रमुख नद्या :- यमुना, रामगंगा, शारदा, गोमती, घागरा

प्राकृतिक वैशिष्ट्ये :- तराई - भाबर नद्यांचे पूरतट, गंगा मोडी वळणे, चंद्राकृती सरोवरे, वालुकामय विस्तारित भाग

ii) मध्य गंगा मैदान :-

विस्तार - ~~पूर्व - पश्चिम~~ पश्चिम - पूर्व = 600 km
रुंदी 330 km

मध्य गंगा मैदानात उ. प्रदेशाचा मध्य व पूर्व भाग आणि बिहार राज्यातील मुझफ्फरपूर व पाटणा यांचा समावेश होतो.

प्रमुख नद्या :- घागरा, गंडक, कोसी

Note - विविध प्रसंगी 24 तासांच्या आत कोसी नदीच्या पात्रात पाण्याची पातळी 10 मीटरपर्यंत वाढते.

कोसी नदीस बिहारचे दुःखाश्रू म्हणतात.

प्राकृतिक वैशिष्ट्ये:: नद्यांचे पुरतट, चंद्राकृती सरोवर, घस-ताल-जल-काबुर (दलदलीचे प्रदेश) इ.

(iii) निम्न गंगा मैदान:-

विस्तार - पश्चिम-पूर्व लांबी 580 km रुंदी 200 km
- पश्चिमेस छोटा नागपूर पठार ते पूर्वेस आसाम राज्य


प्रमुख नद्या:: तिस्ता, जलढका, संकोश (ब्रह्मपुत्रेच्या उपनद्या)
महानंदा, अजय, दामोदर, सुवर्णरेखा (गंगेच्या उपनद्या)

प्राकृतिक वैशिष्ट्ये:: उत्तर बंगाल मैदान, त्रिभुज प्रदेश, सुंदरबन-वने Royal Bengal Tiger, मगरींचे माहेरघर

*(iv) पूर्व मैदान / ब्रह्मपुत्रा मैदान:-

विस्तार - पूर्व-पश्चिम लांबी - 720 km
उत्तर-दक्षिण रुंदी - 60-100 km

प्राकृतिक रचना




उतार - ईशान्य-नैऋत्य (दर किमीस 12 सेमी)

इतर माहिती:: "माजुली बेट" (जगातील सर्वात मोठे नदीपात्रातील बेट)
सध्या जिल्ह्याचा दर्जा प्राप्त

⇒ दलदलीय प्रदेश व चंद्राकृती सरोवराची निर्मिती मोठ्या प्रमाणात.

असेल स्थानिक भाषेत "बिल" म्हणतात.

* सुंदरवन :-

⇒ पश्चिम बंगाल आणि बांग्लादेश यांदरम्यानच्या समुद्रकिनारी बाजूस पसरलेला प्रदेश म्हणजे सुंदरवन

⇒ हे जगातील स. मोठे खारफुटीचे (Mangrove) जंगल आहे. येथील सुंद्रीया वनस्पतींमध्ये समुद्राच्या भरतीसमोर टिकाव धरण्याची क्षमता असल्यामुळे ~~सामान्य~~ या वनस्पतींना खारफुटी वनस्पती असे म्हणतात.

'कुल बेट = 54

या प्रदेशाच्या खूपच छोटा भाग भारतात येतो. याठिकाणी असलेल्या न्यू-मुर या बेटावरून भारत-बांग्लादेश यामध्ये वाद आहे.

→ सुंदरवनचे वैशिष्ट्ये म्हणजे येथे वाघांचे अस्तित्व (Royal Bengal Tiger)

⇒ याठिकाणी सुंदरवन हे राष्ट्रीय उद्यान आहे. जे पश्चिम बंगालमधील चोवीस परगणा या जिल्ह्यात आहे.

⇒ याठिकाणच्या जैवविविधतेमुळे सुंदरवनची जागतिक वारसास्थळ म्हणून निवड करण्यात आली आहे.

⇒ किनारी प्रदेशात आर्द्र पानझडी वृक्षांची अरण्ये आढळतात

⇒ या क्षेत्रातील दाट कच्च भावलाची भाग केन ब्रेकस नावाने ओळखला जातो.


## "C" भारतीय ~~द्विपकल्पी~~ द्विपकल्प पठारी प्रदेश

भारतीय द्विपकल्पाने भारताच्या भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे ४३% भाग व्यापलेला आहे. जो कि इतर प्राकृतिक भागात सर्वाधिक आहे.

लांबी : उत्तर - दक्षिण 1600 km
रुंदी : पूर्व - पश्चिम - 1400 km
सरासरी उंची : 600 ते 900 मी.
सर्वात जास्त उंच अनैमुडी शिखर (2695 मी)
आकार - अनियमित त्रिकोणी.
पाया भारतीय महामैदानाच्या दक्षिणेकडे.
सरहद्द – मैकल पर्वतरांग (उत्तर)
हजारीबाग, राजमहल टेकड्या (ईशान्य)

### द्विपकल्प पठाराचे प्राकृतिक विभाग

i) मध्यवर्ती उंचवट्याचा प्रदेश :
(A) अरवली पर्वतरांग




भारतातील अतिप्राचीन पर्वतरांग
विस्तार – नैऋत्य-ईशान्य (दिल्लीपासून ते पालनपूर (GJ) पर्यंत)
आकार - S सारखा
लांबी - 692 km
प्रमुख नद्या : मही, लुनी, बनास, जोगडी
महत्त्वाच्या खिंडी – बार, पिपलीघाट, ~~देवेरी~~ देसुरी
Note i) अबु पर्वत – बनास नदीमुळे मुख्य अरवली रांगेपासून

वेगळा झाला आहे.

ii) बंगालचा उपसागर व अरबी समुद्रास मिळणाऱ्या नद्यांचे जलविभाजक म्हणून प्रसिद्ध

अभयारण्य:- रणथंबोर, सरिस्का

(B) माळवा पठार:-

* या पठाराच्या पश्चिमेला अरवली रांगा आणि दक्षिणेला विंध्य रांगा आहे.

या प्रदेशातून मही नदी उगम पावते. (शेवट खंबायत आखात)

कमी उठाव आणि सपाट भूप्रदेश ही याची वैशिष्ट्ये

या पठाराचा बहुतांश भाग मध्यप्रदेश राज्यात येतो.

* - नद्यांच्या दोन प्रणाल्या
i) अरबी समुद्र - नर्मदा तापी / मही
ii) बं.उपसागर - यमुना (चंबळ बेतवा केन)

(C) विंध्याचल / बाघेलखंड

स्थान:- माळवा पठाराच्या पूर्वेला
मैकल रांगाच्या उत्तरेला
बुंदेलखंडाच्या आग्नेयेला

विस्तार:- गंगेच्या गाळाच्या मैदानी प्रदेशापासून दक्षिणेस दख्खन पठारा दरम्यान
उंची 800 मी पेक्षा जास्त

याला भारनेर व कैमुर या नावाने ही ओळखले जाते.

नदीचौर्य (River capture) - सुरा नदीचे घग्गर नदीने नदीचौर्य केले असून बिजारगड उंचवट्याखालील पाणी शोण नदीस मिळते.

Note:- नर्मदा नदी ही मध्यवर्ती उच्चभूमी आणि दख्खन पठार यामधील प्राकृतिक सीमारेषा.

(D) विंध्य रांग

- उत्तर आणि दक्षिण भारतातील सीमारेषा म्हणून ओळखली जाते.

विस्तार - ~~उत्तरेला~~ ~~कोटा~~ MP पश्चिम भागापासून ते बिहार पर्यंत
या रांगेची दक्षिण सीमा नर्मदा नदीच्या साहाय्याने आधोरेखित केली आहे.

- उत्तर-दक्षिण भारताचा नैसर्गिक जलविभाजक म्हणून कार्य.

(E) छोटा नागपूर पठार :-

या पठाराचा बराच मोठा प्रदेश झारखंड राज्यात आहे तसेच त्याचा विस्तार शेजारील PB, CH, ओडिशा राज्यात झालेला आहे.

- हे पठार देशातील खनिजसंपत्तीने संपन्न प्रदेशापैकी एक आहे.
- केंद्रत्यागी / अरीय (Radial) नदीप्रणालीचे प्रतिनिधित्व करतात.

प्रमुख नद्या :- दामोदर, सुवर्णरेखा, बराकर, अजय

~~(E) [illegible]~~

(F) मेघालय / शिलाँग पठार

गारो, खासी, जैंतिया टेकड्यांनी वेढलेला प्रदेश

बाह्य बाजूला - मिकिर व रेंगमा टेकड्या


स. उंच ठिकाण - शिलाँग (~~[illegible]~~ 1823 मी)


स. उंच शिखर - नोकरेक (1515 मी)

(ii) दख्खनचे पठार :-

नर्मदा नदीच्या दक्षिणेला असलेला त्रिकोणी प्रदेश हा दख्खनचे पठार म्हणून ओळखला जातो. हा एक उलटा त्रिकोण आहे. ज्याचा पाया उत्तरेला आहे आणि शिरोबिंदू दक्षिणेला आहे. या पठाराचा पाया सातपुडा पर्वतरांगा, महादेव व मैकल डोंगर रांगा मिळून बनलेला आहे.


- पश्चिम घाट आणि पूर्व घाट या दख्खनच्या पठाराच्या सीमा आहेत




रचनेच्या प्रकाराचे पुढील उपभाग पडतात

Ⓐ सातपुडा पर्वत




- पश्चिम-पूर्वेला पसरलेल्या सातपुडा ~~पर्वतामुळे~~ पर्वत तापी व नर्मदा यांच्या खचदऱ्या मध्ये उरलेला भाग म्हणजे सातपुडा पर्वत
लांबी 900 km (GJ ते MP)

⇒ सातपुडा पर्वतात मुख्य 3 रांगांचा समावेश होतो.
i) राजपिपला ii) महादेव iii) मैकल.

i) राजपिपला - विस्तार - पूर्व-पश्चिम प्रामुख्याने गुजरात मध्ये
ii) महादेव विस्तार - उत्तर-दक्षिण
  स.उंच शिखर धूपगड (1350m)
iii) मैकल विस्तार - उत्तर-दक्षिण (MP, CH)
  स.उंच शिखर - अमरकंटक (1050m)

= या पर्वतरांगेतील बऱ्हाणपूर या खिंडीमुळे ही पर्वतरांग पार करता येते.

Ⓑ महाराष्ट्र पठार :- (MH-चा 90% भाग व्यापलेला आहे)
पूर्व-पश्चिम लांबी 750km
दक्षिण-उत्तर लांबी 750km
सर्वसाधारण उंची 450 मी (पश्चिमेला 600 ते पूर्वेला 300)

(C) कर्नाटक/ तेलंगणा पठार

हा दख्खनच्या पठाराचा स. दक्षिणेकडील भाग होय.

- कर्नाटक मध्ये पठारी प्रदेशाला "मैदान" म्हणतात.
- या पठाराचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक कमी उंचीच्या टेकड्या ज्या विविध नद्यांच्या खोऱ्यांचे विभाजन करतात.

स. उंच शिखर बाबाबुदान टेकड्यांमध्ये मुळनगिरी (1913 m) त्यानंतर कुद्रेमुख (1892 मी)

- तेलंगणा पठार :-

  दोन विभाग पडतात

A) तेलंगणा :- यामध्ये तेलंगणा आणि ~~समतो~~ रायलसीमा प्रदेशाचा समावेश होतो.

या प्रदेशातील टेकड्यांना "कोंडा" म्हणतात

उदा:- हनमकोंडा, कर्णीकोंडा, पट्टीकोंडा इ.

(B) रायलसीमा उंचवट्याचा प्रदेश :- विस्तीर्ण टेकड्यांचा प्रदेश

~~(D)~~